अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार अ
न्यायालय, मुंबई या नावाने नवीन PLA
उघडण्याकरीता परवानगी देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः राजस -२०२३/प्र.क्र.२२८/५स
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- ५ एप्रिल, २०२४

संदर्भः- निबंधक, महाराष्ट्र राज्य, सहकार अपिल न्यायालय, मुंबई यांचे दि.२८/४/२०२३ रोजीचे पत्र

शासन निर्णय-

प्रस्तुत प्रकरणामध्ये निबंधक, महाराष्ट्र राज्य, सहकार अपिल न्यायालय, मुंबई यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय, मुंबई या नावाने नवीन PLA खाते उघडण्याकरीता परवानगी मिळणेबाबत शासनास विनंती केली होती.

०२. सदर विनंतीच्या अनुषंगाने अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय, मुंबई या नावाने नवीन PLA खाते उघडण्याबाबतची नस्ती वित्त विभागास मान्यतेकरीता सादर करण्यात आली असता वित्त विभागाने त्यांच्या अनौसं क्र. ०२/२०२४ को.प्र.-५, दि.०५/०१/२०२४ अन्वये अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय, मुंबई या नावाने नवीन PLA खाते उघडण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता दिली आहे.

१) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, मुंबई यांच्या नावे उघडण्यात येणाऱ्या स्वीय प्रपंजी लेखा खात्याचा वापर अशीलांनी भरणा केलेल्या ठेवी, दाव्यातील दंडाची रकमा जमा करण्यात यावे. तसेच दाव्यातील डिपॉझीट केलेल्या रकमांचा परतावा करण्यात येणार आहे. मुद्रांक परतफेड करण्यात येणाऱ्या रकमा खर्च करण्यात याव्यात.

२) वित्त विभाग, शासन निर्णय दि. २४ जानेवारी, २०१४ मधील सूचनानुसार स्वीय प्रपंजी लेखा खाते एक वर्षापेक्षा जास्त कालावधीपर्यंत निष्क्रिय असल्याने बंद करण्यात आल्यास सदर खात्यातील जमा रक्कम लेखाशिर्ष ००७५ मध्ये शासन खाती जमा करण्यात याव्यात.

३) सदर स्वीय प्रपंजी लेखा खात्यामध्ये वेळोवेळी आर्थिक व्यवहार होणे आवश्यक आहे. जेणेकरुन सदर लेखा खाते बंद पडणार नाही. याची दक्षता संबंधित कार्यालयांनी घ्यावी.

४) सदर लेखा खात्याच्या व्यवहारांचे ताळमेळ (reconciliation) व परिक्षण याची सर्व जबाबदारी संबंधित कार्यालयांची राहील.

Regn. I/DEBT ACT/
Appeal/Sr.No/
G-3

०५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ०२/२०२४ को.प्र.-५, दि.०५/०१/२०२४ मा. महालेखापाल कार्यालयाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. १९७/२०२४/१२७६, दि.१३/०३/२०२४ अन्वये दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

०६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२४०४०८११३५३५७००२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरी ने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

ANIL JAYRAM CHAUDHRY

Digitally signed by ANIL JAYRAM CHAUDHRY
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=COORDINATOR MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=1f2d6f0033bfa3333a4d55ddc10a5405c6c6174b5087c6c483ce, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D1744A938E0155E0370D3D33EF775CF1E35AC2EF0E117F8670651611C, cn=ANIL JAYRAM CHAUDHRY
Date: 2024.04.08 11:47:32 +05'30'

(अनिल चौधरी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, सहकार अपिल न्यायालय, मुंबई.
२. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. उपसचिव, वित्त विभाग (कोषा प्रशा ५), मंत्रालय, मुंबई.
४. वरिष्ठ लेखाधिकारी, महालेखाकार कार्यालय (लेखा व हकदारी), मुंबई.
५. निवड नस्ती ५-स.